|| श्री गजानन प्रसन्न ||
|| श्री केशवराज प्रसन्न ||

देवधर दीक्षित बमनो
देवधर
कौशिक गोत्री
मंडळ

आपली आहे प्रगतीची

# वाटचाल

* वर्ष २३ वे, अंक ३ * दि. १५ सप्टेंबर २०२३ * किंमत रु. २०/-



# देवधर मंडळ कार्यकारिणी

## दि. १ /४/२०१९ ते दि. ३१/३/२०२४

✻ **अध्यक्ष**

**सी.ए. सुरेश विश्वनाथ देवधर** (कु. वृ. पान २१/१६२)
१०२, आय विंग, प्रणय नगर, राममंदिर रोड (विस्तारित), बाभई, बोरिवली (प.), मुंबई ४०००९१
दूरध्वनी : ०२२-२८९८१८५६
मोबाईल : ९२२३३६६६४०, ९२२३५०६९८८

✻ **उपाध्यक्ष**

**ॲड. पुरुषोत्तम गोपाळ देवधर** (कु. वृ. पान ३६०/१६९)
ब्लॉक नं. २, भागिरथी टॉवर्स, सर्व्हे नं. ६, हि. नं. ११, कोकण एक्सप्रेस हॉटेल लेन, कोथरूड, पुणे ४११०३८. ❖ मोबाईल : ९८६०३०६३४४

✻ **कार्यवाह**

**सरिता मुकुंद देवधर** (कु. वृ. पान नं. ३५९/१२९)
११, रामकृष्ण भुवन, गोरेगांवकर बिल्डिंग नं. ६, गिरगांव, मुंबई ४००००४.
दूरध्वनी : ०२२-२३८९३९३०
मोबाईल : ९८२०६५९४४७

✻ **सहकार्यवाह**

**सौ. पूर्वा प्रमोद देवधर** (स्वीकृत)
(कु. वृ. पान ८८२/१३२२)
११/१२ सी, दुसरा मजला, झावबा वाडी, ठाकूरद्वार, मुंबई ४००००२. मोबाईल : ९८६९९३९०७२

✻ **कोषाध्यक्ष**

**सी.ए. अकल्पिता चिंतामणी देवधर**
(कु. वृ. पान८९८/१७७८)
देवधर हाऊस, दत्त आळी, गावदेवी चौक, कल्याण (प.) ४२१३०१. मोबाईल : ९८२०३५६४१३

✻ **वाटचाल**

आशिष राम देवधर (कु. वृ. पान ३१/२०३६)
सी/२५, सुरांकित, सिद्धेश्वर आळी, पारनाका, कल्याण (प.) ४२१३०१. मोबाईल : ७०४५३५३६०२

✻ **सभासद**

**नारायण (दिलिप) गोविंद देवधर** (कु.वृ. पान ४१८/१२३)
बी/१०३, आर.एन. ए. हाईट्स, जोगेश्वरी-विक्रोळी लिंक रोड, अंधेरी (पू.), मुंबई ४०००९३.
दूरध्वनी : ०२२-२८२५२१४५
मोबाईल : ९८१९९७२५११

✻ **सभासद**

✻ **श्री. वासुदेव नारायण देवधर** (कु.वृ.पान ४९७/१४५) (स्वीकृत)
सी/३, १०२, सॅटेलाईट क्लासिक, रेल्वे स्टेशनजवळ, गुंफा रोड, जोगेश्वरी (पू.), मुंबई ४०००६०
दूरध्वनी : ०२२-२८२६१०२८, मो.: ९८२०१३४०८४

✻ **श्री. समीर सुरेश देवधर** (कु. वृ. पान ५८८/२२४१) (स्वीकृत)
बी/२४, कैलासधाम सोसायटी, गोपाळनगर गल्ली क्र. १, टायटन शोरूम च्या जवळ, डोंबिवली (पू.) ४२१२०१
मोबाईल : ९८३३१४८४८५

✻ **श्री. विष्णू विनायक देवधर** (स्वीकृत)
(कु.वृ.पान ४३९/१५२८)
बी-४, रूम नं. ३, सप्तर्षी सोसायटी, पांडुरंग वाडी, आनंदनगर, मानपाडा रोड, डोंबिवली (पू.) ४२१२०१
दूरध्वनी : ०२५१-२८०१८३०, मो. : ९८३३१५३९८९

✻ **कु. मीरा जगदीश देवधर** (स्वीकृत)
(कु.वृ.पान ५३४/२४०६)
स्वप्नशिल्प, फ्लॅट नं. १, पहिला मजला, नयनतारा नर्सिंग होम शेजारी, गुलमोहर कॉलनी, सांगली ४१६४१६. मोबाईल : ७०८३८४१४५५

✻ **श्रीमती शुभांगी सुनिल देवधर** (कु. वृ. पान ३१०) (स्वीकृत)
वैनतेय, प्लॉट नं. ३८, प्रेस्टिज पार्क, घाडगे नगर, नाशिक रोड, नाशिक ४२२१०१
दूरध्वनी : ०२५३-२४६४७८०
मोबाईल : ९८९०२४०५२२

✻ **मानद लेखा परीक्षक**

**सी.ए. किरण अनंत देवधर** (कु.वृ. पान १६२/१३७४)
१८ ई स्केअर, स्टेट बँकेच्या वर, शहाजी राजे मार्ग, विलेपार्ले (पूर्व) मुंबई ४०००५७
मोबाईल : ९८२०३३५०९३

# अध्यक्षांचे मनोगत



बुधवार दि. २३ ऑगस्ट २०२३ हा दिवस भारताच्या वैज्ञानिक इतिहासात सोनेरी अक्षराने लिहिला गेला.

भारतासह अवघे जग ज्या क्षणाची आतुरतेने वाट पाहत होते. ती चांद्रयान मोहीम इस्त्रोने बुधवार दि. २३ ऑगस्ट रोजी सायंकाळी सहा वाजून तीन मिनिटांनी यशस्वीरित्या पूर्ण करून चंद्राला गवसणी घातली आहे. चांद्रयान - ३ चे यशस्वी 'सॉफ्ट लँडिंग' चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर करणारा भारत हा पहिला देश ठरला आहे. त्याचे साक्षीदार होण्याचे भाग्य आपल्या सगळ्यांना लाभले आहे.

१५ ऑगस्ट २०२३ रोजी भारताचा ७७ वा स्वातंत्र्यदिन आपण उत्साहाने साजरा केला. त्या दिवशी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लाल किल्ल्यावरून भाषण करताना भ्रष्टाचार, परंपरावाद आणि तुष्टीकरण यावर नियंत्रण मिळविण्याचा संकल्प केला.

ब्रिटिशांनी लादलेले आणि आता कालबाह्य झालेले तीन नियम बदलण्याची घोषणा केली. भारत जेव्हा १५ ऑगस्ट २०४७ साली स्वातंत्र्याची १०० वर्षे पूर्ण करेल, त्या दिवशी जगात एक प्रगत राष्ट्र म्हणून गणला जाईल.

या संबंधी मला आवडलेली एक चारोळी..
रंग बलिदानाचा त्या तिरंग्यात पहावा!
उत्साह देशप्रेमाचा अंगी संचारावा!
जयघोष भारताचा आसमंती गुंजावा!
सण हा स्वातंत्र्याचा सदैव चिरायू व्हावा!
असो...

देवधर मंडळाची ४७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. ६ ऑगस्ट २०२३ रोजी कल्याण येथे संपन्न झाली. या सभेत अनेक विषयांवर सविस्तर चर्चा होऊन सर्व निर्णय सर्वानुमते संमत झाले.

सन २०२३ मधील वार्षिक स्नेहसंमेलन दि. ६ व ७ मे रोजी सांगली येथे संपन्न झाले. त्यामुळे पुढील वार्षिक स्नेहसंमेलन २०२४ मध्ये न घेता, २०२३-२४ च्या आर्थिक वर्षात ठिकठिकाणी आनंद मेळावे आयोजित करण्याचा मानस आहे. त्यातील पहिला आनंद मेळावा उत्कर्ष मंडळ, विलेपार्ले येथे २८ ऑक्टोबर २०२३ रोजी सायंकाळी ४.०० ते ८.०० या वेळात होणार आहे. या आनंद मेळाव्यात पश्चिम उपनगरातील (चर्चगेट ते विरार, डहाणू, पालघर) सभासद मोठ्या संख्येने उपस्थित राहवे अशी अपेक्षा आहे.

पुढील आनंद मेळावा पुणे येथे दि. २५ नोव्हेंबर २०२३ रोजी आयोजित करण्यात येणार आहे. तसेच फेब्रुवारी २०२४ मध्ये नाशिक येथे आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात येणार आहे.

तसेच २०२४-२५ या आर्थिक वर्षात इंदोर, उज्जैन, नागपूर इ. ठिकाणी आनंद मेळावे आयोजित करण्याचा मानस आहे.

जे सभासद वार्षिक स्नेहसंमेलन, वार्षिक सर्वसाधारण सभेला येऊ शकले नाहीत, ते आनंद मेळाव्याला येऊ शकतात, त्यांच्याशी प्रत्यक्ष संपर्क, परिचय होईल. त्यांना मंडळाच्या विविध उपक्रमांची माहिती देता येईल. हाच हेतू आनंद मेळाव्यांच्या आयोजनामागे आहे. आपल्या सभासदांच्या मंडळाकडून काय अपेक्षा आहेत हे कळू शकते. नवीन उपक्रमही सुचविले जाऊ शकतात. परस्पर परिचयातून 'एकमेका साहाय्य करू अवघे होऊ समर्थ/श्रीमंत' हा उद्देश सफल होण्यास मदत होईल. स्थानिक सभासदांनी अशा मेळाव्यासाठी पुढाकार घ्यावा ही विनंती. मदतीसाठी मंडळाची कार्यकारिणी आहेच.

***

# आनंद मेळावे

आपल्या बऱ्याच कुलबंधू भगिनींना वार्षिक स्नेहसंमेलनाला हजेरी लावता येत नाही. म्हणून आपण विविध ठिकाणी आनंद मेळावे घ्यायचं ठरवलं आहे.

## मुंबई आणि पश्चिम उपनगर विभाग

स्थळ :- उत्कर्ष मंडळ, शानबाग हॉल, उत्कर्ष मंडळ चौक, मालवीय मार्ग, विलेपार्ले पूर्व, मुंबई - ५७

तारीख :- शनिवार, २८ ऑक्टोबर २०२३

वेळ :- संध्याकाळी ४ ते ९

शुल्क :- ३००/ प्रत्येकी

## पुणे विभाग

स्थळ :- अश्वमेघ हॉल, कर्वे रोड, रांका ज्वेलर्सच्या मागे, एरंडवणे, पुणे

तारीख :- शनिवार, २५ नोव्हेंबर २०२३

वेळ :- संध्याकाळी ४ ते ९

शुल्क :- ३००/ प्रत्येकी

***

चला तर मग सर्वांनी सहकुटुंब सहपरिवार नक्की यायचं आहे. नवीन ओळखी करूया, छोटे मोठे खेळ खेळूया, गाणी म्हणूया, भरपूर गप्पा मारू या आणि खाण्यापिण्याचा आनंद लुटू या!

### सत्कार समारंभ

- ७५ वर्ष पूर्ण झालेल्या व्यक्ती आणि लग्नाला ५० वर्षे पूर्ण झालेली दांपत्ये अशा सर्वांचा सत्कार करण्यात येईल.
- वरील सत्कार ज्यांचे करायचे आधी राहून गेले आहेत अशा व्यक्तिंनीही कृपया त्वरित संपर्क साधावा ही नम्र विनंती.
- त्याचप्रमाणे इयत्ता १० वी, १२ वी आणि पदवी परीक्षा यात ८०% आणि त्याहून अधिक गुण मिळवलेल्या यशस्वी विद्यार्थिनी/विद्यार्थ्यांचेही सत्कार होतील.
- तरी सर्व सत्कारमूर्तींनी आपली उपस्थिती आणि आवश्यक ती माहिती लवकरात कळवावी.

अर्थातच उत्तम नियोजनासाठी सर्वांनी त्वरित नावनोंदणी करू या आणि इतरही सक्रिय सहभागासह या मेळाव्याचा आनंद लुटू या.

**आनंद मेळाव्याचे पैसे भरण्यासाठी मंडळाच्या बँक खात्याचा तपशील :**

नाव : Deodhar Mandal Madhyavarti IDBI Bank, कल्याण

S.B.A/c No.: 45310010007645

IFSC : IBKL0000456

पैसे भरल्यावर कृपया स्क्रीनशॉट पाठवावा आणि संपूर्ण नाव कळवावे म्हणजे नोंदणी करणे सोपे जाईल.

**नाव नोंदणीसाठी संपर्क:-**

**मुंबई व पश्चिम उपनगराच्या मेळाव्यासाठी :-**

सौ. आदिती अमित देवधर, अंधेरी

मोबाईल : ८८७९०९०५२८

सौ. पूर्वा प्रमोद देवधर. चर्नीरोड

मोबाईल : ९८६९९३९०७२

**पुणे विभाग मेळाव्यासाठी :-**

महेंद्र सदाशिव देवधर - मो : ९८८१२९९५९७

समीर सुरेश देवधर - मो : ९८३३१४८४८५

धन्यवाद!

# वाटचाल वितारणासंबंधी निवेदन

नमस्कार कुलबंधू/ भगिनींनो,

१५ डिसेंबर २०२२ च्या वाटचालच्या त्रैमासिकात सहकार्यवाह सौ. पूर्वा प्रमोद देवधर यांनी आपणांस आपला अंक व्हॉट्सॲप अथवा ई-मेलने हवा असल्यास तसे, पूर्ण माहितीसह कळविण्याचे कळकळीचे आवाहन केलेले आहे, ते आपण सर्वांनी वाचले असावे असे गृहित धरतो.

मी, नरेश कृष्णाजी दीक्षित, रा. डोंबिवली, वाटचालच्या अंकांच्या पत्त्यांसदर्भात काम करतो. आपल्याकडे येणारा वाटचालचा अंक बरोबर येतो कां, तसेच आपला पत्ता बदलला असेल तर नवीन पत्ता बदल करणे, नवीन सभासदांना स्वतंत्र किंवा कुटुंबात जोडून अंक पाठविण्यासाठी कार्यरत असतो, याची आपणास कल्पना असेलच. वाटचालचे अंक परत आल्यावर, ते परत कां आले असावे याचा धांडोळा नातेवाईकांचे फोन/ मोबाईल नंबर असतील तर घेणे शक्य होते. परंतु अनेकदा असे लक्षात येते की त्यांच्या जवळच्या नातेवाईकांचे सुद्धा फोन नंबर नसतात. मग तो अंक बंद करणे इष्ट ठरते. परंतु गंमत म्हणजे अशा सभासदांकडून आमचा अंक बंद कां झाला अशी साधी विचारणा सुद्धा होत नांही. मग प्रश्न पडतो की खरंच तो अंक तुम्हाला नको आहे कां? म्हणून विनंती की आपल्याला अंक नको असल्यास आपण तसे कळवू शकता, त्याबद्दलही आपल्या सहकार्याचे स्वागत होईल.

ज्या सभासदाच्या नावाने वाटचाल अंक घरी पोहोचतो त्याचे निधन झाल्यावर तो अंक ६ महिने तसाच चालू ठेवू. म्हणजे पुढील दोन वाटचाल त्या पत्त्यावर जातील

त्यादरम्यान संबंधित कुटुंबीयांनी तो अंक पुढे पाठवायचा की नाही ते मला स्पष्ट शब्दात कळवावे. अर्थातच संबंधित कुटुंबीय मंडळाचा आजीव सभासद असणे आवश्यक आहे.

**दुसरी एक विनंती की, जर आपल्या पत्त्यावर आपला मोबाईल क्रमांक लिहिलेला नसेल तर तो ताबडतोब मला कळवावा. अन्यथा सदरचा अंक आपणापर्यंत पोचतच नांही/ नसावा असे गृहित धरून आपला अंक थांबविण्यासाठी मंडळाला विचार करावा लागेल.**

पुणे/ मुंबई य ेथे अनेक कार्यक्रम होत असूनही, नवनवीन कुलबंधू येतच नाहीत, त्यामुळे त्यांचे संपर्क क्रमांक मिळविणे हे सोपे कामही करता येत नाही. तरी विनंती की, आपण वाटचालचा अंक मिळत असून वाचत असाल तर, वरती केलेल्या अपेक्षा पूर्ण करण्याचा प्रयत्न करावा. त्यासाठी माहिती माझे मोबाईल नंबर वर फक्त मेसेज/ SMS च्या रूपात पाठवावी. यामध्ये आपल्या नावात आपल्या वडिलांचे नाव लिहिण्यास विसरू नये. सभासद क्रमांक, पान नंबर कळवावा. अथवा श्री. आशिष देवधर यांच्याकडे (मोबाईल : ७०४५३५३६०२) व्हॉट्स ॲप वर कळवावे. अंक हवा असेल तर पूर्ण पत्ता सुद्धा कळवावा.

वाटचालच्या माध्यमातून आपण सर्व कुलबंधू-भगिनी एकमेकांच्या संपर्कात राहतो. त्यामुळे वाटचाल सर्वांपर्यंत यशस्वीपणे पोहोचावा हेच मंडळाचे उद्दिष्ट आहे. त्यासाठी आपणाकडून सहकार्याची अपेक्षा आहे.

माझे नाव व मोबाईल नंबर - नरेश कृष्णाजी दीक्षित. ९८२०४६७७४२.

***

# मल्लखांबाचे जनक : बाळंभटदादा देवधर

संकलक - **विनित मधुसुदन देवधर** (सांगली)

ही गोष्ट आहे एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीची, म्हणजेच दुसऱ्या बाजीराव पेशव्यांच्या काळातली. मराठी राज्य पानिपतच्या दारुण पराभवानंतर.....

मराठी दरबारापुढं एक आव्हान येऊन ठेपलं. हे आव्हान होतं हैद्राबादच्या निजामाकडनं, देशातल्या बाकीच्या राज्यांमधल्या मातीत दंड थोपवत विजय मिळवून आलेले अली आणि गुलाबी यांच्याविरुद्ध. या दोन कसलेल्या, भीमकाय आणि बलदंड पैलवानांनी दुसऱ्या बाजीराव पेशव्यांच्या दरबारात कुस्तीचं तगड आव्हान दिलं. पण या पैलवान गड्यांचा आत्मविश्वास, त्यांची रग आणि तयारी बघून दरबारात पेशव्यांच्या पदरी असलेल्या बावन्न पैलवानांमधल्या एकाचीही समोर यायची हिम्मत झाली नाही.

आता थेट पेशव्यांच्या इभ्रतीचा प्रश्न आहे म्हंटल्यावर पेशव्यांकडे भिक्षुकी करणाऱ्या सतरा अठरा वर्षाच्या बाळंभटदादा देवधर यांनी हा विडा उचलला अन तयारीसाठी थोडा वेळ मागितला.

बाळंभट यांनी त्यांच्या नाशिकजवळच्या कोठुरे गावी जाऊन मातेचे आशीर्वाद घेतले आणि नाशिक जिल्ह्यात असलेल्या वणीच्या डोंगरावर वसलेल्या सप्तशृंगी देवीची आराधना सुरू केली. असं म्हणतात की, त्यांच्या कठोर आराधनेने देवी प्रसन्न झाली आणि तिने बाळंभट दादांना आशीर्वाद दिला की, ''प्रत्यक्ष मारुतीरायाच त्यांना कुस्तीचे डाव शिकवतील.''

याप्रमाणे बजरंगबलीने दृष्टांत देऊन एका लाकडी लाटेवर (खांबावर) कुस्तीचे डाव दाखवले. काहीजण असंही म्हणतात की, ''झाडावर खेळणाऱ्या माकडांमुळे बाळंभटांना मल्लखांबची कल्पना सुचली.''

शिकवणी पूर्ण झाल्यानंतर ठरलेल्या मुदतीत बाळंभटदादा पुण्याला परतले. आखाडा सुरू झाला आणि स्वतःपेक्षा वयाने, अनुभवाने, वजनाने मातब्बर असलेल्या अलीला बाळंभटांनी चितपट केले. गुलाबी तर दादांची तयारी बघूनच तिथून पळाला!!!.

दरम्यान, पुढं १८१८ मध्ये मराठा संस्थान खालसा झाले आणि इंग्रजांनी पेशव्यांची रवानगी उत्तर प्रदेशातील कानपूर जवळच्या ब्रह्मावर्त इथं केली. पुण्याहून पायपीट करत कानपूरला जाताना पेशव्यांबरोबर बाळंभटदादाही होते. पेशव्यांनी जिथं जिथं मुक्काम केला तिथं तिथं त्यांनी कुस्तीचा आखाडा सुरू केला, ज्यात मल्लखांब सुद्धा लावले.

१८५७ च्या पहिल्या स्वातंत्र्यसंग्राम युद्धामध्ये बाळंभट्टदादा देवधर यांचे सक्रिय योगदान होते, म्हणून ईस्ट इंडिया कंपनीने त्यांच्यावर वॉरंट काढले ''जिंदा या मुर्दा'' पकडण्यासाठी.

पण नंतर १ नोव्हेंबर १८५८ ला 'Queens proclamation' मध्ये ईस्ट इंडिया कंपनीचे charter काढून घेण्यात आले आणि ब्रिटिश crown ची स्थापना झाली, आणि ज्यांच्यावर

...... पान ८ वर)

# कु. सायली देवधर हिचे कीर्तन

- सौ. स्वाती देवधर (ठाणे)

रविवार दि. ६ ऑगस्ट २०२३ रोजी कल्याण येथे झालेल्या देवधर मंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या दिवशी सभेनंतर कु. सायली देवधर (बेळगांव) हिच्या कीर्तनाचा कार्यक्रम झाला. ती बेळगांव वरून तेवढ्यासाठी आवर्जून आली होती. खरं म्हणजे सगळ्यांनाच तिचे कीर्तन ऐकण्याची उत्सुकता होती. कीर्तनाला सुरुवात करण्यासाठी ती जेव्हा मंचावर आली, तेव्हाच तिने सर्वांची मने जिंकली.

कीर्तनाच्या पारंपारिक वेशात ती खूपच छान दिसत होती. प्रत्यक्ष तिच्या पहिल्या श्लोकानं रामकृष्ण हरीच्या गजराने सर्व सभागृह भक्तिरसात बुडून गेले.

पूर्वरंगात घेतलेला समर्थांचा 'मनुजा होई सावधान' हा अभंग अतिशय समर्पक होता. त्याचे विश्लेषण त्या करिता आवश्यक असलेली उदाहरणे, श्लोक, कथा याही अगदी उत्तम आणि मनाला भावणाऱ्या होत्या. आपल्या भाग्याने आपल्याला मिळणाऱ्या मानव जन्माचे आपण सार्थक केले पाहिजे, सावधपणाने राहिले पाहिजे, नामस्मरणात गुंतून घेतले पाहिजे हे तिने अगदी कळकळीने सांगितले.

पूर्वरंगानंतर तिला हार घालण्याची आणि बुक्का लावण्याची संधी मला मिळाली याचे मला खूप समाधान आहे.

पूर्वरंगानंतर रंगराज स्वामींचे आख्यान होते. ही कथा तर खूपच भावली. समर्थ पंचायतनाची माहिती मिळाली, जी मला माहिती नव्हती. एकंदरीत कीर्तन अतिशय उत्तम झाले.

कीर्तन अधिक रंजक होण्यासाठी तबला साथ कु. ईशान भट याने केली व हार्मोनियम साथ श्री. जयंत फडके यांनी केली.

एका कीर्तनासाठी लागणारे गुण, आवाज, सूरतालाचे ज्ञान, सभाधीटपणा, वेळेच भान, उत्स्फूर्त प्रतिक्रिया, चालू घडामोडींचे ज्ञान, त्याचा अभ्यास, खुमासदार भाषा हे सर्व गुण सायलीकडे पुरेपूर आहेत. तिचे भविष्य उज्ज्वल आहे. लौकिक शिक्षणाबरोबर अशी कला जोपासणे व त्यामध्ये प्रगती करणे हे खरोखरच कौतुकास्पद आहे. तिची ही कला जोपासण्यात तिच्या आईवडिलांचा मोलाचा वाटा आहे. त्यांचेही खूप कौतुक.

असं काही ऐकलं, पाहिलं की, आम्हा आजीआजोबांची पिढी, आईबाबांची पिढी यांच्या मनात पुढच्या तरुण पिढीच्या भविष्याची जी काळजी आहे, त्याला नक्कीच दिलासा मिळतो. सायलीचे मन:पूर्व अभिनंदन आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा आणि आशीर्वाद!

***



# तन्मय आणि आयुषीचे सुयश

**– शुभांगी सुनिल देवधर, नाशिक**

तन्मय आणि आयुषी देवधर नाशिकच्या कीर्ती आणि प्रशांत देवधरांचे चिरंजीव व सुकन्या. आज त्यांचं खरोखरच कौतुक करावं असं खूप मोठं यश त्यांनी संपादन केलेलं आहे.



तन्मय याने १९ किलोमीटर नदीमध्ये मुर्शिदाबाद (west Bengal) येथे swimming compitation मधे भाग घेतला होता आणि त्यांनी ते अंतर दोन तास तीस मिनिटांमध्ये पूर्ण केलं. अत्यंत साहसी आणि धाडसी अशी ही स्पर्धा होती. ही स्पर्धा जागतिक स्तरावरती असते. अनेक देशातल्या स्पर्धकांनी या स्पर्धेमध्ये भाग घेतलेला होता. तन्मयला आई-वडील व त्याचे कोच या सगळ्यांचे उत्तम मार्गदर्शन मिळालं. तन्मयनी अत्यंत मेहनतीने आणि अत्यंत कष्टाने तसंच सर्वात सातत्य ठेवून हे यश संपादन केलं. खरोखर तन्मयचं मनापासून कौतुक आणि देवधर कुलोत्पन्न असलेल्या तन्मयचा आम्हा सगळ्या देवधर बंधू भगिनींना मोठा अभिमान आहे. तन्मयच्या आई-वडिलांचे सुद्धा मनापासून अभिनंदन!

आयुषीने अत्यंत लहान वयापासून पोहायला सुरुवात केली. तिला देवधरांची जलपरी असेही म्हणायला हरकत नाही. अनेक स्पर्धांमध्ये तिने भाग घेतलेला आहे. आत्ताच तिची निवड नॅशनल कॉम्पिटिशनसाठी झाली होती. तिचं तीन वेगवेगळ्या swimming प्रकारासाठी participation होतं. ही कॉम्पिटिशन बालेवाडी येथे झाली. तिथे तीनही प्रकारात तिने उत्तम कामगिरी केली आहे. तिने पण silver आणि bronze पदक मिळवले आहे. आयुषीनी सुद्धा अत्यंत मेहनतीने आणि अत्यंत कष्टाने हे यश संपादन केलेल आहे. ही दोन्ही मुलं संध्याकाळी नियमाने swimming pool वर असतात. त्यांच्या कष्टाचं चीज झाले.



देवधर कुलोत्पन्न असलेल्या ह्या गुणी मुलांचा आपणा सर्व देवधरांना मनापासून अभिमान वाटावा असंच त्यांचं कर्तृत्व आहे.

देवधर मंडळातर्फे कार्यकारी सदस्य शुभांगी देवधर यांनी दोघांचं मनःपूर्वक अभिनंदन केलं आहे व दोघांना पुढच्या यशासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

***

## कु. सुमितचे सुयश



केळकर एज्युकेशन ट्रस्ट च्या वि. ग. वझे महाविद्यालयाच्या संस्कृत विभागातर्फे आयोजित केलेल्या ध्रुवा संस्कृत महोत्सव २०२३ मधील आंतरमहाविद्यालयीन गायन स्पर्धेत डोंबिवली येथील सुमित समीर देवधर याने प्रथम पारितोषिक मिळविले.

'उठी श्रीरामा' हे गाणं त्याने संस्कृत मध्ये सादर केले. प्रमाणपत्र आणि मेडल असे पारितोषिकाचे स्वरूप आहे.


सुमारे २८ ते २९ महाविद्यालयातील स्पर्धकांनी या स्पर्धेत भाग घेतला होता.

## नवीन सदर

# यशस्वीतांचा परिचय

आपल्या देवधर - दीक्षित - ढमढेरे कुलबंधू-भगिनींमध्ये अशा अनेक व्यक्ती आहेत, ज्या नेहमीची ठरलेली घर आणि ऑफिस एवढाच दिनक्रम न स्वीकारता किंवा त्यात राहूनही काही वेगळ्या वाटा निवडून, समजोपयोगी काम करून यशस्वी व्यक्ती म्हणून पुढे आल्या आहेत. अशा व्यक्तिंचा परिचय आपणा सर्वांना करून देणे हा या सदरमागील उद्देश आहे. आपणही आपल्या परिचित असलेल्या अशा यशस्वी देवधर व्यक्तिंची माहिती या सदरकरिता पाठवावी ही विनंती.

# रवींद्र पांडुरंग देवधर



खरंतर मी फुटबॉल खेळाडू, गोलकीपर. संध्याकाळी ग्राउंडवर असणारा. मातीशी घट्ट नातं जोडणारा. एका अपघातानंतर उजव्या पायाची ३ ऑपरेशन झाली आणि खेळावर बंदी आली. संध्याकाळी काय करायचे म्हणून आराधना नाट्य संघ, पुणे येथे कलाकारांची कायिक तालीम घेण्यासाठी बोलावलं आणि आयुष्यात 'नाटक' आलं १९८२ साली. त्यानंतर १९९२ मध्ये ipta ह्या नाट्यसंस्थेत 'मदान' या नाटकात पोतराजची मुख्य भूमिका करण्यासाठी बोलावलं. ही संस्था खूप जुनी आणि दिग्गज कलाकार असलेली. त्यामुळे ए.के.हंगल, अंजन श्रीवास्तव, अवतार गिल, सुलभा आर्य ,जावेद सिद्दकी, नारायण सुर्वे, वामन केंद्रे अशा महान कलाकारांशी संपर्क आला, संस्कार झाले आणि अभिनेता आणि दिग्दर्शक म्हणून मार्गदर्शन मिळाले. नाटक करताना फक्त करमणूक नाही तर सामाजिक संदेशही असला पाहिजे या संस्कारातून पुढे प्रवास सुरू झाला. त्याचबरोबर कितीही प्रसिद्धी मिळाली तरी जमीन सोडायची नाही हे तत्त्व कळले आणि ते आत्मसात केले; अगदी आजपर्यंत.

१९८२ पासून आराधना नाट्य संघातून प्रायोगिक नाटकात भूमिका करीत आहे.

१९९२ ला 'मदान' ह्या पोतराजाच्या आयुष्यावर असलेल्या नाटकात मुख्य भूमिका. इप्टा ह्या संस्थेमार्फत. त्यानंतर आजपर्यंत त्या संस्थेत भूमिका, दिग्दर्शन करीत आहे.

'अग्निपथ', 'मी मंत्री झालो', 'देवाघरची फुले' या नाटकात मुख्य भूमिका. 'परिचय' संस्थेच्या 'आम्ही जातो अमुच्या गावा', 'सती' या नाटकात भूमिका

'मुक्ता', 'सवत माझी लाडकी' या चित्रपटात भूमिका

नुकतीच ''चपराक'' ह्या शॉर्ट फिल्म मध्ये मुख्य भूमिका आणि ४ स्पर्धात best actor चे पारितोषिक

'आकडा' या हिंदी चित्रपटात महत्त्वाची भूमिका. हा चित्रपट मे मधे प्रदर्शित होत आहे.

नुकत्याच सुस्नेह फिल्म्सच्या ''फिर भी'' या हिंदी चित्रपटात गीतांजली वाजपेयी या मुख्य अभिनेत्रीच्या वडिलांची भूमिका केली.

कोकणात गेली ४ वर्ष प्रामुख्याने खेड्यातल्या मुलांसाठी नाट्य प्रशिक्षण शिबिरे घेत आहे.

१९९२ ते २००२ खूप नाटकात अभिनय केला. प्रमुख भूमिका सादर करायचा प्रयत्न केला. २००२ ला ''चीताई''ह्या नाटकातील प्रमुख भूमिकेने आणि दिग्दर्शनाचे राज्य नाट्यस्पर्धेत प्राथमिक आणि अंतिम फेरीत अभिनयाचे रौप्य पदक, प्राथमिक स्पर्धेत दिग्दर्शनाचे प्रथम पारितोषिक मिळालेच; पण नाट्य परिषद, पुणे शाखेचा भालबा केळकर पुरस्कार, नाट्य परिषद मध्यावर्तीचा नाट्य कलामंदिर पुरस्कार मिळाले. भारतीय आयुर्विमा महामंडळामधे विविध महत्त्वाच्या पदांवर कार्य करीत होतो. त्यामुळे बदल्या अपरिहार्य होत्या. पण बदलीच्या गावांमध्ये एकांकिका स्पर्धा, नाट्य स्पर्धा यांना परीक्षक म्हणून जायचो त्यामुळे नाटकाच्या संपर्कात राहिलो. २०१९ मध्ये स्वेच्छा निवृत्ती घेतली आणि पूर्णवेळ रंगभूमीवर राहायचं असं ठरवलं. दरम्यान 'स मरणयात्रा' हे एकपात्री, 'सोड्याचे पोह','इंवेस्टमेंट' या एकांकिका लिहून झाल्या. आणि 'आता तरी बदला' हे नाटक लिहिले. जे चार महिन्यात स्टेजवर येईल.

'मी भारतीय' हा माझीच संकल्पना असलेला दीर्घांक सादरीकरण सुरू आहे. ४ सप्टेंबर पर्यंत त्याचे १३३ प्रयोग झाले आहेत. हा दीर्घांक चळवळ म्हणूनच करतो आहे. तरुण पिढीला स्वातंत्र्याचे महत्व पटवून देण्याचा प्रयत्न करीत आहे. खूपच छान प्रतिसाद आहे. जवळ पास ८० पेक्षा जास्त शाळांमध्ये याचे प्रयोग झाले. सुरू आहेत. ४ सप्टेंबर रोजी ६.३० तासात ४ प्रयोग खेड (दापोली) येथे सादर केले. रत्नागिरी आकाशवाणी मध्ये मुलाखत घेतली, प्रसारित झाली. ह्या राष्ट्राचे आपण देणं लागतो आणि त्यासाठी शेवटच्या श्वासापर्यंत जो खारीचा वारा उचलता येईल, त्यासाठी रंगभूमीच्या माध्यमातून प्रयत्न करतोय.

मोबाईल नंबर:- ९४२२३४४५५५

(पान ४ वरून ......

वॉरंट होते त्यांना 'amnesty' देण्यात आली आणि बाळंभट्टदादा देवधर 'वडोदरा' येथे प्रकट झाले!

त्यांचे पुत्र नारायण देवधर यांनी वडोदरा येथे एक व्यायामशाळा बांधली, वडोदराचे देवधर कुलबंधू यांना त्याची अचूक माहिती असेल.

बाळंभटदादांचे पुत्र आणि शिष्य नारायणगुरू देवधर यांनी मल्लखांबाचा भारतात प्रसार करण्यासाठी महत्त्वाचं योगदान दिले. सुरत, बडोदा, भोपाळ, उज्जैन, देवास, इंदूर, झांशी, ग्वाल्हेर येथे त्या काळी सुरू झालेले आखाडे आजही अस्तित्वात आहेत आणि तिथं मल्लखांब आजही चालतो.

दादांनी ज्या लाकडी खांबावर कसून सराव केला, त्या खांबाला त्यांनी 'मल्लखांब' असं नाव दिलं. मल्लांनी साथीदाराच्या अनुपस्थितीत ज्याच्यावर सराव करायचा तो मल्लखांब.

मल्लखांबचे जनक म्हणून बाळंभट्टदादा देवधर फेमस झाले.

***

# घन:श्याम यशवंत दीक्षित

जन्म – गिरगांव, मुंबई.

शालेय शिक्षण - चिकित्सक समूह शिरोळकर हायस्कूल, गिरगांव व महाविद्यालयीन शिक्षण हिंदुजा कॉलेज, चर्नी रोड येथे (१४ वी कॉमर्स) झाले.



मूळचा गिरगावकर, गेली १५ वर्षे दादरकर, नंतर माहीम, आणि आता ठाण्याला कायमचा वास्तव्याला आलो. १९९६ साली विवाह झाला. पत्नी सौ. माधवी, उच्च शिक्षित असून, स्टँडर्ड चार्टर्ड बँकेत वरिष्ठ अधिकारी म्हणून कार्यरत आहे. मुलगा चि. पार्थ, सी. ए. च्या अंतिम वर्षाला आहे.

मी, मुंबई महानगरपालिकेमध्ये १६ ऑगस्ट १९८३ ला लिपिक म्हणून रुजू झालो. वेळोवेळी बढती मिळून, अंतिमतः मालमत्ताकर खात्यात 'सहाय्यक करनिर्धारक व संकलक'(Assistant Assessor Collector) या पदावरून १ डिसेंबर, २०२० रोजी, ३८ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर सन्मानाने निवृत्त झालो. या कालावधीमध्ये महापालिकेचा महसूल गोळा करण्याचे उद्दिष्ट अनेक विभागात यशस्वीपणे पार पाडले. तसेच, महापालिकेच्या निवडणूक शाखेत प्रत्येक निवडणुकीत १९९३ पासून सहभागी होतो. २०१७ च्या निवडणुकीत सुमारे ७००० कर्मचाऱ्यांना, निवडणुकीचे प्रशिक्षण दिले होते.

लहानपणापासून सांस्कृतिक क्षेत्राशी निगडित. बाल नाट्यांमधून सुधा करमरकर, सई परांजपे, सुलभा देशपांडे, इ. नामवंतांच्या हाताखाली काम केले. काही व्यावसायिक नाटकातही बदली म्हणून भाग घेतला. १९७९ ते १९८३ पर्यंत, 'या, थोडी गंमत करू या' या एकपात्री कार्यक्रमाचे १७५ कार्यक्रम केले. १९८३ ते १९९९, ''स्वरसाज(गिरगांव)' या वाद्यवृंदाचा सहसंयोजक आणि निवेदक म्हणून ३७५ कार्यक्रम केले. तदूनंतर, २००० ते आजमितीस, 'श्री स्वरनाद' या हिंदी- मराठी वाद्यवृंदाचे ५७५ कार्यक्रम झाले आहेत. महाराष्ट्रात आणि महाराष्ट्राच्या बाहेरही गेल्या ४० वर्षात अनेक कार्यक्रम केलेत. श्री. श्रीधर फडके, कै. नंदू होनप, अप्पा वढावकर, इ. मान्यवर संगीतकारांच्या वैयक्तिक कार्यक्रमातही निवेदक म्हणून अनेकदा सहभागी झालोय. दूरदर्शनवरील एक दोन मालिकांमध्ये अभिनयही केला आहे. अनेक सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक संस्थांच्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करतो. ऑल इंडिया रेडियो आणि फिल्म्स डिव्हिजन ऑफ इंडिया, यांचा मान्यताप्राप्त मराठी निवेदक आहे. मुंबई आकाशवाणीच्या अनेक नभोनाट्यांमध्ये सहभाग घेतला. फिल्म्स डिव्हिजनच्या दोन महितीपटांना आवाज दिला आहे.(Voice Over).

या व्यतिरिक्त आश्रयसेवाभावी संस्था, गिरगावचा कार्यकारिणी सभासद आहे. चित्तपवान ब्राह्मण संघ, गिरगांवचा कार्यवाह म्हणून २००१ ते २००४ मध्ये आणि २०१६ ते मार्च २०२२ पर्यंत संस्थेचा उपाध्यक्ष म्हणून कार्यरत होतो. ब्राह्मण सहाय्यक संघ, शिवाजी पार्क यांच्या कार्यकरिणीवर २०१२ पासून कार्यरत आहे

# डॉ. अलका रवींद्र देवधर

३१ डिसेंबर १९५५ ला अमरावतीमध्ये माझा जन्म झाला. पण वडील भिवंडीला कार्यरत असल्यामुळे पुढे भिवंडीतल्या प. रा. विद्यालयामध्ये माझे शालेय शिक्षण झाले. त्यानंतर उच्च शिक्षणासाठी मी पुण्याला आले. पुण्यातील एमईएस महाविद्यालयामध्ये त्या वेळेचे इंटरसायन्स केले. मग पुढे काय करायचे? तर डॉक्टर व्हायचे ठरविले. लहानपणी आमच्या गावात एक खूप चांगले फॅमिली डॉक्टर होते, कदाचित त्यांच्याकडे पाहूनच आपणही पुढे डॉक्टर व्हावे, असे स्वप्न मनात कुठेतरी रुजले असणार, असे आता वाटते. सहाजिकच त्या दृष्टीने प्रयत्न सुरू होतेच. त्या प्रयत्नांना यश मिळाले आणि बी जे मेडीकल सारख्या प्रतिष्ठीत वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश मिळाला. १९७७ साली एमबीबीएस ही पदवी मिळवून मी माझे स्वप्न साकार केले.



१९७७ हे वर्ष माझ्यासाठी खासच म्हणावे लागेल; कारण त्याच वर्षी १८ डिसेंबरला माझा रवींद्र देवधर यांच्याशी विवाह झाला. (रवींद्र हे बी.ई. असून, त्यांचा शिवणे येथे स्वतःचा लघुउद्योग आहे.) पुढे लवकरच माझ्या मुलीचा जन्म झाला. त्यामुळे एम.डी.साठी प्रवेश मिळूनही, मी पुढे शिक्षण न घेण्याचा निर्णय घेतला आणि एप्रिल १९८१ रोजी, रामनवमीच्या मुहूर्तावर कोथरूडला दवाखाना सुरू केला. अर्थातच यासाठी आईवडील, सासुसासरे यांची प्रेरणा आणि पतीचा भक्कम पाठिंबा सोबत होताच...तेंव्हापासून फॅमिली फिजिशियन म्हणून गेली चाळीस वर्षे हे काम निरंतर सुरू आहे.

सुरुवातीलाच एक गोष्ट मनाशी ठरवली होती, ती म्हणजे या कामाकडे केवळ व्यवसाय म्हणून पाहायचे नाही. रुग्णसेवा हीच माझ्यासाठी महत्त्वाची होती. वक्तशीरपणा आणि माफक शुल्क (फी) या दोन गोष्टी कसोशीने पाळल्या. महागाई निर्देशांकानुसार यात वाढ करावी, हा विचारही कधी मनात आला नाही. त्याचबरोबर रुग्ण आपल्याला त्यांच्या कुटुंबातीलच एक मानत असतात हे नेहमी लक्षात ठेवले आणि त्यांची फॅमिली डॉक्टर म्हणून त्यांच्याशी प्रेमाचे व जिव्हाळ्याचे नाते जपण्याचा प्रयत्न केला. केवळ शारीरिक आजारच नाही, तर प्रसंगी त्यांच्या कौटुंबिक अडचणी सोडवण्यासाठी मार्गदर्शन केले. माझी आई भिवंडीत गरीब मुलांना मोफत शिकवायची, तोच वारसा जपण्याचा प्रयत्न करत, कोथरुडमध्ये बांधकाम कामगारांना मोफत उपचार दिले. त्यासाठी बाहेरून लागणारी औषधे, तपासण्या, त्यांच्या लहान मुलांची औषधे यासाठी आर्थिक आधार आणि जोडीला बालसंगोपनासाठी मार्गदर्शन केले. माझ्या या मदतीबद्दल या लोकांनी माझ्या दवाखान्यात माझा अतिशय प्रेमाने सत्कार केला आणि मला माझ्या कामाबद्दल अगदी कृतकृत्य वाटले.

कोविड तर सगळ्यांसाठी एक मोठी सत्त्वपरीक्षा होती. पण संपूर्ण कोविड काळात एकही दिवस माझा दवाखाना बंद राहिला नाही.

...... पान १२ वर)

# Osteoarthritis **अर्थात संधिवात**


**डॉ. दीप देवधर** (नाशिक)
(Physiotherapist)

सोप्या किंवा सामान्य भाषेत सांगायचं झालं तर, 'आर्थरायटीस' म्हणजे संधिवात.


आपल्या शरीरातील दोन सांध्यांमध्ये एक द्रव पदार्थ असतो. हा थर सांध्यांना एकमेकांवर घासण्यापासून सुरक्षा देतो. आर्थरायटीसमध्ये सांध्यांमधील जागा कमी होते. सांध्यांमधील द्रव पदार्थाचं प्रमाण कमी होत जातं. त्यामुळे सांधे जास्त संवेदनाक्षम बनतात आणि त्यांचं हळूहळू डी-जनरेशन होण्यास सुरुवात होते.

कार्टिलेजची धक्का सहन करण्याची क्षमता (Shock Absorbing) कमी झाल्यामुळे सांधे एकमेकांवर घासण्याचं प्रमाण वाढतं. सांधे सातत्याने एकमेकांवर घासल्यामुळे किंवा घर्षणामुळे कार्टिलेजला सूज येते किंवा त्यांची ताठरता वाढते.

A joint affected by osteoarthritis




A healthy joint




**संधिवातची कारणे –**

१. वाढणारं वय
२. वाढलेलं वजन
३. महिलांमध्ये हार्मोनल बदलांमुळे गुढघा जास्त दुखतो.
४. पूर्वी कधी गुडघ्याला किंवा गुडघ्याच्या आजूबाजूस फ्रॅक्चर झालेले असल्यास हा त्रास वाढतो.
५. अनुवांशिकता.

**संधिवातची लक्षणे–**

१. सांधेदुखी
२. सांध्यांमध्ये जाणवणारी ताठरता (stiffness)
३. सूज
४. हाडांमधून बसताना कट कट आवाज ये़णे.
५. खूप वेळ एकाच जागी बसले तर अचानक उठण्यास त्रास होणे.
६. मांडी न घालता येणे.
७. पायऱ्या चढताना आणि उतरताना होणारा त्रास
८. बसलेल्या अवस्थेतून उठताना होणारा त्रास

जेंव्हा सुरुवातीला ही लक्षणे रुग्णांमध्ये

दिसतात, तेव्हा याकडे दुर्लक्ष केले जाते. त्यामुळे संधिवाताची समस्या ही वाढतच जाते.त्त्यामुळे अगदी शस्त्रक्रिया करायची वेळ येते. म्हणूनच वरील काही लक्षणे दिसली की, लगेचच डॉक्टरांचा सल्ला घेणे फायदेशीर आहे.

फिजिओथेरपी उपचार केल्यामुळे शस्त्रक्रिया ही पुढे ढकलली जाऊ शकते किंवा टाळताही येऊ शकते.

आर्थरायटिस असलेल्या रुग्णांच्या उपचारात फिजिओथेरपी महत्त्वाचा पैलू आहे. फिजिओथेरपी व्यायामांमुळे हालचालीची पुनर्स्थापना होऊन लवचिकताही साधता येते.

फिजिओथेरेपीचा वापर : सांध्याची हालचाल आणि अस्थिसंधिवाताची वाढ नियंत्रणात ठेवण्याकरता व्यायाम महत्त्वाचा आहे.

**फिजिओथेरपीचे महत्त्व :**

१. वेदना आणि सूज यांचे व्यवस्थापन : शरीराच्या त्या भागामध्ये फिजिओथेरपिस्टच्या सल्ल्यानुसार गरम/थंड शेक देणे आयएफटी, टीईएनएस सारख्या विद्युत पद्धतींचा वापर वेदना कमी करण्यासाठी केला जाऊ शकतो.

२. सांध्याची लवचिकता आणि गतिशीलता सुधारणे : प्रभावित सांध्याच्या गतीची श्रेणी सुधारण्यासाठी स्ट्रेचिंग आणि हलका व्यायाम केल्यास अधिक मदत होते.

३. स्नायूंचे बळकटीकरण : सांध्याभोवतालचे स्नायू ठराविक वेळेनंतर कमकुवत होतात त्यामुळे स्नायूंना मजबूत करणे महत्त्वाचे आहे.

४. स्नायुंचे संतुलन आणि समन्वय सुधारणे: स्नायूंच्या कमकुवतपणामुळे संतुलन समस्या उद्भवू शकतात. परिणामी वारंवार पडणे आणि दुखापतीही उद्भवू शकतात. म्हणून संतुलन आणि समन्वय प्रशिक्षण महत्त्वाचे आहे.

**जीवनशैलीत बदल करणे :**

१. मांडी घालून न बसणे,

२. जमिनीवर न बसणे;

३. भारतीय पद्धतीच्या शौचालयांचा वापर टाळणे.

४. जास्त चढ उतार न करणे.

***

(पान १० वरून ......

या काळात पुण्यात आलेल्या कामगारांना त्यांच्या घरी जाण्यास मी मदत करू शकले. माझ्या वैद्यकीय सेवेबद्दल 'कोथरूड भूषण' हा पुरस्कार देऊन माझा गौरव करण्यात आला. हा पुरस्कार मला माझ्या कोथरूड परिसरातील विस्तारित कुटुंबांकडून मिळालेली प्रेमाची पावतीच वाटला.

कुटुंबाची साथ, रुग्णांचा माझ्यावरील विश्वास व प्रेम यामुळेच माझा चाळीस वर्षांचा हा प्रवास खूप सुखाचा झाला. आज मी अतिशय समाधानी आहे. मुलगा कैलास व सून श्वेता वडिलांच्या व्यवसायात अतिशय समर्थपणे जबाबदारी पेलत आहेत. मुलगी डॉ. गायत्री (एम .डी. पॅथॉलॉजी) आणि जावई डॉ. शिरीष पाठक (एमएस. ऑर्थो) हे आपापल्या क्षेत्रात कार्यरत आहेत. ''भविष्यातही, माझ्याकडून रुग्णांना समाधान देणारी सेवा घडू दे'' हीच ईश्वर चरणी प्रार्थना .

***

# नलिनी पर्व

१० ऑक्टोबर १९१८ ते २१ ऑगस्ट २०२३

शुभांगी देवधर (नाशिक)

लग्न झाल्यावर घवातल्या सर्वांची हळूहळू ओळख होऊ लागते. स्वभाव कळू लागतात. तशी हळूहळू सासूबाई (नलिनी) यांच्या स्वभावाची ओळख होऊ लागली. खूप बोलायच्या. अनुभवाचा खूप मोठा खजिना होता. अनुभव सांगायची पद्धत गमतीशीर होती. पुणेरी पद्धतीने हळूच चिमटे काढायच्या. पण टोकाची किंवा आग्रही भूमिका कधीच नसायची.



कराची (पाकिस्तान) बद्दल खूप आपुलकीने बोलायच्या. १९३९ साली लग्नानंतर पुण्याहून त्या कराचीला गेल्या. त्या काळी लग्न होऊन कराचीला जाणं हे धाडस होतं. मोठ्या भावाने छातीवर दगड ठेऊन लग्न लावून दिलं. पण बाईचं (नलिनीचं) पत्र येईपर्यंत जीवात जीव नव्हता. गोपाळराव (माझे सासरे) सी.पी.डब्ल्यू. डी या सरकारी खात्यात हेड अकाऊंटंट होते. सरकारी नोकरी होती त्यामुळे राहणीमान छान होते. कराचीमध्ये सुबत्ता होती. नलिनीला कराची आवडू लागलं. तिथून पुण्यात यायला दोन दिवसांचा रेल्वे प्रवास करायला लागायचा. त्यामुळे माहेरी येणं सोपं नव्हतं. सतीशचा (मोठा मुलगा) जन्म कराचीचाच. पण या सुंदर संसाराला भारत - पाकिस्तान फाळणीचं गालबोट लागलं. घरदार संसार सोडून यावं लागलं. सगळं अस्थिर झालं. पण मोठ्या भावाच्या आधारानी पुन्हा संसार मांडला.

चार मुलं व एक मुलगी सगळे उत्तम शिकले. जबाबदार झाले. सगळ्यांची लग्ने होऊन मार्गी लागले. गोपाळराव (माझे सासरे) यांचे निधन हा खूप मोठा धक्का होता. संसार अर्धवट होता पण हिमतीने पुढचा प्रवास सुरू केला. मुलांच्या संसाराला लागेल तशी मदत केली. सुना, जावई, नातवंडं, पतवंडं, सगळ्यांना आपलंसं केलं. सगळ्यांना जीव लावला.

कधीच सुनामुलांवर काहीही लादलं नाही. देवधर्म जमेल तसा करा असं धोरण ठेवलं. या प्रवासात अनेक गोष्टी होत्या, ज्या पटल्या नाहीत.पण कुठेही अडकून पडल्या नाहीत. त्या त्या वेळी मतभेद तिथेच सोडून पुढे जायचं हेच धोरण ठेवलं.

स्वच्छतेची आवड होती. अगदी वयाच्या शंभराव्या वर्षापर्यंत स्वत:चं नऊवारी पातळ स्वत:च धूत होत्या. भांडी सारखी घासायला खूप आवडायचं. कधी पोथी-पुराणात रमल्या नाहीत. क्रिकेटची मॅच तर आवडीने बघायच्या. त्यातील रनरेट, नोबॉल, एलबीडब्ल्यू सगळं कळायचं. त्यांचं क्रिकेटवेड पाहून सगळे अचंबित होत.

एकशे पाच वर्षांचा प्रवास पाच पिढ्यांशी जपला. ज्यांची वेळोवेळी मदत झाली, त्यांच्याबद्दल मनात कायम कृतज्ञता होती. त्यांची प्रगल्भता अनेक गोष्टींमधून जाणवायची. आजूबाजूला घडणाऱ्या सगळ्या गोष्टी माहिती असायच्या. वर्तमानपत्र वाचायच्या, बातम्या ऐकायच्या त्यामुळे सगळ्यांशी संवाद असायचा. उदासिनता कधीही जाणवायची नाही. घरात काम करणाऱ्या महिलांशीही आपुलकीने बोलायच्या. चौरस आहार त्यांना आवडे. आपल्याबरोबर त्यांनी इतरांचेही आयुष्य सुखी केलं एखाद्या नदीसारखं.

श्वेता सरिता योगिनी दिव्यत्वाची प्रचीती 'नलिनी'!

## दुःखद निधन

* सौ. अंजली रमेश देवधर (वय ७१ वर्षे)
गोरेगाव, मुंबई.
सभासद क्रमांक १२४०/ पृष्ठ क्रमांक १९९
निधन : दि. १९-०४-२०२३

* श्री. अविनाश दिवाकर देवधर
निधन : दि. १० मे २०२३
सभासद क्रमांक २९१/ पृष्ठ क्रमांक ९६७

* पद्मनाभ बाबुराव देवधर (वय ७७ वर्षे)
निधन :२६ फेब्रुवारी २०२३
सभासद क्रमांक ५१९/ पृष्ठ क्रमांक ४५७

* श्री. अभिर अनिल ढमढेरे (वय ४४ वर्षे)
पुणे( मूळचे इंदौरचे)
सभासद क्रमांक २७१८ / कु पा २८२
निधन : दि. १ मे २०२३

* श्रीमती शोभना गणेश देवधर,
विलेपार्ले पूर्व.
सभासद क्रमांक २४३ / पृष्ठ क्रमांक ३३५
निधन : ५ मे २०२३

* चंद्रशेखर गोपाळ देवधर (वय ७४ वर्षे)
नागपूर
सभासद क्रमांक ८१२ / पृष्ठ क्रमांक ९४३
निधन : २२ मे २०२३

* भास्कर हरि देवधर (वय ९३ वर्षे)
ठाणे
सभासद क्र. ३१०/ कु.वृ. पान ३५४
निधन : दि.२४ मे २०२३

* श्री. वासुदेव जनार्दन देवधर (वय ७८ वर्षे)
माणगाव, जि.रायगड
सभासद क्रमांक २३६७/ कु.वृ. पान ४३९
निधन : दि. ३० मे २०२३

* गिरिश नारायण देवधर वय (६५ वर्षे)
अंधेरी, मुंबई
सभासद क्रमांक १०२६/ कु.वृ. पान ९२९
निधन : दि. ०४ जून २०२३

* श्रीमती पद्मिनी जनार्दन देवधर (८७ वर्षे)
डोंबिवली.
सभासद क्रमांक १५२९ /कु. वृ. पान ३५५
निधन : ०८ जून २०२३

* शशिकांत भास्कर देवधर (८४ वर्षे)
पुणे.
सभासद क्रमांक ११७१/ कु. वृ. पान ३३०
निधन २३-०७-२०२२

* सौ. ज्योती देवधर (वय ७१ वर्षे)
जबलपूर
निधन : दि. २७ जून २०२३

* श्रीमती स्मिता रामचंद्र जोशी (७७ वर्षे)
(स्मिता गोविंद देवधर - माहेर)
मूळच्या दादरच्या.
सध्या वास्तव्य विश्रामबाग सांगली
सभासद क्रमांक १७१९/ कु.वृ. पान ३९४
निधन : ०३ जुलै२०२३

* प्रसाद विश्वास देवधर (वय ४४ वर्षे)
तासगाव
(सध्या वास्तव विश्रामबाग सांगली.
निधन ०३-०७-२०२३

* अंजली माधव ओक, ठाणे,
  पूर्वाश्रमीच्या विजया शंकर देवधर
  निधन : दि. १८ जून २०२३
* माधवी मधुसूदन जोशी (वय ७९ वर्षे)
  माहेरच्या माधवी सदाशिव देवधर
  सभासद क्र. १६१४/ कु.वृ. पान ३५५
  निधन : दि. १८ मार्च २०२३

* काशिनाथ महादेव देवधर (वय ८२ वर्षे)
  ठाणे
  सभासद क्र. १०२/ कु.वृ. पान ३३९
  निधन : २२ जून २०२३

* श्रीमती यशोदा सखाराम देवधर
  मालाड.
  सभासद क्रमांक २७०/कु.वृ. पान ४९६
  निधन : दि. १८ जुलै २०२३

* श्रीमती मंगला वामन देवधर (वय ९६ वर्षे)
  पुणे
  कु पान क्रमांक ३०६
  निधन : दि. ०४ ऑगस्ट २०२३

## * छपाईतील दुरुस्ती *

जून २०२३ मधील वाटचालच्या अंकात पान क्र. १८ वर शैक्षणिक मदत या सदरात नजरचुकीनी आभा अनुराग ढमढेरे, इंदूर असे छापले गेले होते. ते अनुश्री अनुराग ढमढेरे असे वाचावे. झालेल्या सदर चुकीबद्दल दिलगीर आहोत.

* मदन गोपाळ देवधर (वय ७६ वर्षे)
  नागपूर
  सभासद क्रमांक ८११/ कु.वृ.पान ९४३
  निधन : २१ ऑगस्ट २०२३

* बळवंत विष्णू देवधर
  डोंगरगड, मध्य प्रदेश
  सभासद क्रमांक १३६८/कु.वृ.पान ४१७
  निधन : १६ ऑगस्ट २०२२


* श्रीमती शैलजा विश्वनाथ देवधर
  मुलुंड
  सभासद क्रमांक २८२/कु.वृ.पान १९
  निधन : दि. १७ ऑगस्ट २०२३

* श्रीमती कमला शरद देवधर
  दादर
  सभासद क्रमांक ८३/कु.वृ.पान ६८९
  निधन : २८ ऑगस्ट २०२३

* श्रीमती नलिनी गोपाळ देवधर
  पुणे
  निधन : २१ ऑगस्ट २०२३

* शोभना गणेश देवधर
  अंधेरी
  सभासद क्रमांक २४३/कु.वृ.पान ३३५
  निधन : २८ एप्रिल २०२३

दु:खितांचे दु:खात देवधर दीक्षित - ढमढेरे मंडळाचे कार्यकारिणी सदस्य व सर्व कुलबंधू-भगिनी सहभागी आहेत.



## वाटचाल वितरण संबंधी निवेदन

नमस्कार मंडळी.

आपलं वाटचाल त्रैमासिक पोस्टाद्वारे पोहोचण्यास बऱ्याचदा खूप उशीर होतो किंवा मिळतच नाही अशा तक्रारी येतात. म्हणून ऑनलाइन पर्यायही उपलब्ध केला आहे. आपल्या व्हाट्सअप च्या सर्व समूहांत ऑनलाईन वाटचाल ही पाठवला जातोच. पण तरीही इतर अनेक पोस्ट्सच्या गर्दीत तो पटकन पाहिला जात नाही. (miss होतो)

ज्या सभासद कुलबांधव आणि भगिनींना फक्त ऑनलाइन च पाठवून हवा असेल त्यांनी खाली दिलेल्या व्हाट्सअप क्रमांकावर व्हाट्सअप मेसेज करावा. अथवा ईमेल आयडीवर इ मेल पाठवावा.

त्या मेसेज मध्ये तुमचं संपूर्ण नांव, संपूर्ण पत्ता, संपर्क क्रमांक, ई-मेल आयडी ही संपूर्ण माहिती नमूद करावी. वाटचाल अंक तुमच्या ई-मेल आयडीवर पाठवायचा आहे की व्हाट्सअप क्रमांकावर पाठवायचा आहे ते कृपया स्पष्ट लिहावे. आपण निवडलेला हा पर्याय कायमस्वरुपी असेल, त्यानंतर त्यात शक्यतो बदल करू नये. ह्याची कृपया नोंद घ्यावी. ही नम्र विनंती. धन्यवाद.

-पूर्वा देवधर.

९८६९९३९०७२

येथे फक्त मेसेज पाठवणे, (फोन करू नये)

अथवा

purdeo.77@gmail.com येथे ईमेल पाठवावा

## आर्थिक मदतीसाठी आवाहन

देवधर मंडळाच्या सर्व कुलबंधु-भगिनींना सादर नमस्कार.

देवधर कुलबंधू-भगिनींना अडचणीच्या काळात मदत करणे हे कर्तव्य असल्याची मंडळाची भावना आहे. त्या भावनेपोटी मंडळातील कोणाला आजारपणासाठी मदत लागली, शैक्षणिक मदत लागली अथवा नैसर्गिक आपत्तीमुळे अर्थसाहाय्य लागले तर मंडळाच्या ठरलेल्या धोरणांप्रमाणे संबंधीत गरजू कुलबांधवाला अथवा भगिनीला मंडळ अवश्य मदत करते. अर्थात ही मदत मंडळ आपल्या कुलुबंधु-भगिनींकडून आलेल्या आर्थिक मदतीच्या जीवावरच करीत आहे त्यामुळे आपणा सर्वांना पुन्हा एकदा कळकळीचे आवाहन की मंडळाच्या शिक्षण निधी, आरोग्य निधी, आपत्ती निवारण निधी यासाठी मनापासून मदत करा. आपण केलेली मदत आपल्याच एका कुलबंधूच्या आयुष्याची गाडी रुळावर येण्यासाठी उपयोगी पडेल.

देवधर मंडळाच्या सर्वसाधारण सभेत घेतलेल्या निर्णयाप्रमाणे दरवर्षी प्रत्येक आजीव सभासदाने प्रत्येकी रुपये ३००/- संवर्धन देणगी म्हणून द्यावी अशी विनंती सर्व सभासदांना करण्यात येत आहे. वार्षिक सभा, वाटचाल असे इतर गोष्टींसाठी निधी उपलब्ध होऊ शकेल.

देवधर मंडळाचे कार्यकारी मंडळ हे सर्व कुलबंधु-भगिनींचे प्रतिनिधीत्व करते, कारभार सांभाळते. जबाबदारी मात्र आपल्या सर्वांचीच. नाही का?






नाशिक येतील तन्मय व आरुषी देवधर या भावंडांनी दोन वेगवेगळ्या ठिकाणी आयोजित केलेल्या swimming compitation मध्ये उज्ज्वल यश संपादन केले. मंडळाच्या कार्यकारिणी सदस्या श्रीमती शुभांगी देवधर यांनी त्यांचे घरी जाऊन कौतुक केले.




मंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा कल्याण येथे दि. ६ मे रोजी संपन्न झाली. सभेनंतर कु. सायली देवधर (बेळगांव) हिचे कीर्तन आयोजित करण्यात आले होते. तिचा सत्कार करताना सौ. स्वाती सुधीर देवधर (ठाणे) (वृत्त पान ५ वर)



## अभिनंदन वरदा!

थोरामोठ्यांच्या आशीर्वादाने आणि तुम्हा रसिक प्रेक्षकांच्या प्रेमामुळे आपल्या देवधर मंडळाची छोटी सदस्या आणि यशोदेच्या भूमिकेमुळे मराठी सिरियल आणि चित्रपटसृष्टीत गाजत असलेल्या वरदा देवधर हिला आयुषमान प्रतिष्ठान व स्वरकुल संस्था यांच्यामार्फत डॉ. वीणा खाडिलकर यांच्या हस्ते महाराष्ट्र रत्न पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. वरदाचे आणि तसेच तिचे पालक श्री. केयूर आणि सौ. शिल्पा यांचे मन:पूर्वक अभिनंदन!




मंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा कल्याण येथे दि. ६ मे रोजी संपन्न झाली. सभेस उपस्थित कुलबंधू-भगिनी

Book Packet
Containing periodical
R.N.I. No. : MAHMAR/2000/4869

प्रति,

माननीय

संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक श्री. वा. ना. देवधर यांचेसाठी आशिष देवधर यांनी साधना ऑफसेट, भारताचार्य वैद्य चौक, कल्याण येथे छापून, वैद्य वाडा, टिळक चौक, कल्याण (प.) ४२१३०१ येथे प्रसिद्ध केले.